# उ प सं हा र

# उ प सं हा र

=-=-=-=-=-=-=-=-=-=

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुर्नघटनेचे शतक आहे. या शतकात महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी वाङ्‌मय यामध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल घडून आला. या याच कालखंडात मराठी वाङ्‌मयातही फार मोठ्या प्रमाणात स्थित्यंतर घडून आले. किंबहुना इहवादी दृष्टिकोनातून निबंध हा वाङ्‌मय प्रकार मराठी वाङ्‌मयाला मिळालेली फार मोठी देणगीच आहे, असे म्हणावे लागेल जीवनविषयक नव्या जाणीवा इहवादी दृष्टीकोनातून समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचविण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून मराठी निबंध होय. आणि हे कार्य निबंध या वाङ्‌मयप्रकाराने केले असेच म्हणावे लागेल. चिपळूणकरांनी आपल्या निबंधाच्या माध्यमाद्वारे मराठी वाङ्‌मयात एक नवे पर्वच निर्माण केले. परंतु चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरूपही तितकेच महत्वाचे व अभ्यासनीय आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पूर्वी कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडूरंग तर्खडकर, भाउ महाजन, लोकहितवादी, बाबा पद्मनजी, का. बा. मराठे यांनी निबंध वाङ्‌मय विकसित करण्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. मराठी माणसाच्या मनाची व वैचारिकतेची मशागतच वरील निबंधकारानी केलेली आहे. चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरूप काय होते. याचा एक चिकित्सक अभ्यास या प्रबंधिकेत केला आहे.

" चिपळूणकरपूर्व निबंधाचा अभ्यास " हे शीर्षक तात्कालीन वाङ्‌मयाचे स्वरूप पाहण्यासाठी पुरेसे आहे असे मला वाटते. या काळातील निबंधाचा व त्याला अनुसरून इतर सर्व वाङ्‌मयप्रकारांचा

सुव्यवस्थित अभ्यास करता यावा म्हणून प्रस्तुत प्रबंधिकेचे पाच प्रकरणात विभाजन केले आहे.

प्रकरण क्रमांक एक मध्ये " चिपळूणकर पूर्व निबंधाची संकल्पना व उत्पत्ती " या उपमथळ्याखाली निबंध या वाङ्:मयप्रकाराच्या इंग्रजी साहित्यिकांनी केलेल्या व्याख्या, चिपळूणकरपूर्व निबंधातील बालबोधपणा, याच काळात वृत्तपत्र आणि मासिके यांनी केलेली महत्वपूर्ण कामगिरी यांचाही आढावा माझ्या शब्दात घेतला आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीची वाङ्:मयनिर्मिती ही ख-या अर्थाने मराठी साहित्य निर्मितीचा उष:कालच होता. प्रारंभी भाषांतरीत स्वरुपाची व कांही प्रमाणात स्वतंत्र्य निर्मिती याच कालखंडात झाली. एक प्रकारे हा कालखंड संक्रमणाचा कालखंड होता. त्या निर्मितीच्या प्रेरणाही वेगवेगळ्या स्वरुपाच्या होत्या. या निरनिराळ्या प्रेरणांचा साकल्याने आढावा प्रकरण क्रमांक दोन मध्ये " मराठी वाङ्:मय निर्मितीच्या प्रेरणा " या उपमथळ्या खाली घेतला आहे.

ज्या निबंधाच्या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकातील निबंध या वाङ्:मयप्रकाराचा अभ्यास मी या प्रबंधिकेत मांडला आहे. ते मिसेस फरार यांचा " कुटुंबवर्तननीति", "लोकहितवादींचा हिंदुस्थानच्या पराधिनतेची कारणे", बाबा पद्मनजी यांचा "स्त्रीविद्याभ्यास निबंध", विष्णूबुवा ब्रम्हचारी यांचा "सुखदायी राज्यप्रकरणी निबंध", व का.बा.मराठे यांचा "नावल व नाटक ह्याज विषयी निबंध" हे एकूण पाच निबंध ऐतिहासिक क्रमानुसार दिले असून त्यामध्ये प्रस्तुत निबंधाचे परिक्षण दिले आहे. ते तिस-या प्रकरणामध्ये.

वरील निबंधाच्या अनुषंगाने एकूणच एकोणिसाव्या शतकातील निबंधाचा आशय व अभिव्यक्तीच्या पध्दती, अभिव्यक्तिचे वेगळेपण, त्यांची

वाङ्‌मयीन वैशिष्टये, सामाजिक वैशिष्टये, रचनेचे वेगळेपण, भाषिक वैशिष्टये, यासारख्या मुद्दयांचा आढावा घेतला आहे. तो प्रकरण क्रमांक चार मध्ये.

तर म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील निबंध वाङ्‌मयाने मराठी वाङ्‌मयाला कोणत्याप्रकारची देणगी दिली हे सारांश रूपाने प्रकरण पाच मध्ये दिले आहे.

=0=0=0=0=0=